# PAPER-II
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________________
   (Name) ____________________________
2. (Signature) ____________________________
   (Name) ____________________________

| J | 3 | 8 | 1 | 6 |
|---|---|---|---|---|

OMR Sheet No. : .............................................
(To be filled by the Candidate)

Roll No. | | | | | | | | |

(In figures as per admission card)

Roll No.________________________________
(In words)

Time : **1 ¼** hours] [Maximum Marks : **100**

Number of Pages in this Booklet : **12** Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of fifty multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the Test Booklet Number should be entered on the OMR Sheet and the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (1), (2), (3) and (4). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** ① ② ● ④
   where (3) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark your response at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your Name, Roll Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, such as change of response by scratching or using white fluid, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the Original OMR Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry original question booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Black Ball point pen provided by C.B.S.E.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. इस पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. इस प्रश्न-पत्र में पचास बहुविकल्पीय प्रश्न हैं ।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए पुस्तिका पर लगी कागज की सील को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात् किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।**
   (iii) इस जाँच के बाद प्रश्न-पुस्तिका का नंबर OMR पत्रक पर अंकित करें और OMR पत्रक का नंबर इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें ।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (1), (2), (3) तथा (4) दिये गये हैं । आपको सही उत्तर के वृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है :
   **उदाहरण** : ① ② ● ④
   जबकि (3) सही उत्तर है ।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पुस्तिका के अन्दर दिये गये OMR पत्रक पर ही** अंकित करने हैं । यदि आप OMR पत्रक पर दिये गये वृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा ।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें ।
8. यदि आप OMR पत्रक पर नियत स्थान के अलावा अपना नाम, रोल नम्बर, फोन नम्बर या कोई भी ऐसा चिह्न जिससे आपकी पहचान हो सके, अंकित करते हैं अथवा अभद्र भाषा का प्रयोग करते हैं, या कोई अन्य अनुचित साधन का प्रयोग करते हैं, जैसे कि अंकित किये गये उत्तर को मिटाना या सफेद स्याही से बदलना तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित किये जा सकते हैं ।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर मूल OMR पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें । हालांकि आप परीक्षा समाप्ति पर मूल प्रश्न-पुस्तिका तथा OMR पत्रक की डुप्लीकेट प्रति अपने साथ ले जा सकते हैं ।
10. **केवल C.B.S.E. द्वारा प्रदान किये गये काले बाल प्वाईंट पेन का ही इस्तेमाल करें ।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।**
12. **गलत उत्तरों के लिए कोई नकारात्मक अंक नहीं हैं ।**

# MARATHI
# मराठी
## Paper – II
## प्रश्नपत्रिका – II

**Note :** This paper contains **fifty (50)** objective type questions, each question carrying **two (2)** marks. Attempt **all** the questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत विविध पर्याय असलेले **पन्नास (50)** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न अनिवार्य आहेत.

**1.** कित्येकदा काही भाषांतून एकच अर्थ व्यक्त करण्यासाठी अगदी तेच किंवा पुष्कळसे साम्य असलेले ध्वनिसमूह उपयोगात येत असतात. त्यांचा खुलासा करण्यासाठी कोणती उपयत्ती सुचवली जाते ?

(1) भाषांतर्गत भौगोलिक स्थलसाम्याची (2) भाषेच्या संग्राहक वृत्तीची

(3) भाषिक उसनवारीची (4) भाषाकुलाच्या संकल्पनेची

**2.** भाषाभ्यासाच्या पारंपरिक पद्धतींमध्ये भाषेच्या सर्वसामान्य (युनिव्हर्सल) वैशिष्ट्यांवर भर दिलेला असतो; परंतु अशी सर्व भाषांना समान असणारी कोणतीही वैशिष्ट्ये खरे पाहाता सापडत नाहीत.

हे मत कोणाचे ?

(1) फ्रान्झ बोस (2) लिअनार्ड ब्लूम फील्ड

(3) मार्टिन ज्यूस (4) लुई येमस्लेव

**3.** स्वनिमांना एकत्र आणून भाषिक रचनेचा जो स्तर सिद्ध होतो त्या स्तरावरील मूलघटकाला अर्थ असतो. या मूलघटकाला काय म्हणतात ?

(1) स्वनसंच (2) पदावली

(3) पदिम (4) संयोगप्रवण

**4.** स्वनांच्या व्यवच्छेदक गुणधर्मांनी मिळून तयार झालेला एक समुच्चय म्हणजे स्वनिम या संकल्पनेचा उपयोग भाषाविज्ञानाच्या अभ्यासात कोणी केला ?

(1) चॉम्स्की व हॅले यांनी (2) हॉकिट व हॅरिस यांनी

(3) अमेरिकन संरचनावाद्यांनी (4) प्राग स्कूलच्या भाषावैज्ञानिकांनी

**5.** अर्थ म्हणजे काय ?

(1) सत्य (2) विचार

(3) मानसिक चित्र (4) संकल्पना

**6.** महापुरुषांचे महानिर्वाण होते, महनीय व्यक्तींना देवाज्ञा होते, योगी पुरुष समाधी घेतात, देशभक्त हुतात्मा होतात या शब्दयोजनांमधून कोणत्या प्रकारचा अर्थ व्यक्त होतो ?

(1) भावपर अर्थ (2) उद्‌भूत अर्थ

(3) शैलीगत अर्थ (4) साहचर्यपर अर्थ

**7.** संयुक्त क्रियापदात कोणती प्रक्रिया घडते ?

(1) लाक्षणिक अर्थाच्या प्रवेशाने शब्दाचे व्याकरणमूल्य बदलते.

(2) अर्थदृष्टया अभेद उत्पन्न होतो.

(3) संयुक्त कालार्थ निर्माण होतो.

(4) सहाय धातू दुसऱ्या धातूला गौण ठरतो.

**8.** हा सूर्य आणि हा जयद्रथ, शरपंजरी पडणे, रामराज्य या शब्दांतील अर्थप्रक्रियेचा प्रकार कोणता ?

(1) रूपकजन्य अर्थप्रक्रिया (2) साम्यतत्त्वमूलक अर्थप्रक्रिया

(3) समासमूलक अर्थप्रक्रिया (4) अर्थसार

**9.** प्रमाणभाषेचे मुख्य कार्य कोणते ?

(1) ज्ञानसंपादन व ज्ञानवितरण (2) पूर्वकालीन शब्दसंपत्तीची उपलब्धता

(3) परस्परविनिमयसुलभता (4) शिष्ट समाज मान्यता

**10.** पुढीलपैकी कोणता शब्द लेखनविषयक नियमांनुसार आहे ?

(1) लिलाललीतकलानीधी (2) लीलाललीतकलानिधि

(3) लीलाललितकलानिधी (4) लिलाललितकलानीधि

**11.** “श्रीधरवर्माच्या काळातील म्हणजे इ.स. चौथ्या शतकातील ‘एरण’ येथील स्तंभलेखात महाराष्ट्राचा निर्देश आहे, तो कालक्रमाने पहिला ठरतो.” असे कोणाचे मत आहे ?

(1) वि.ल. भावे (2) शं.बा. जोशी

(3) वि.का. राजवाडे (4) वा.वि. मिराशी

**12.** शके 1201 मधील आदिलाबादच्या किनवटच्या आडरानात असणाऱ्या शिलालेखास 'उन्हकदेव' शिलालेख असे का संबोधले जाते ?

(1) ऊन-वाऱ्यात तो उघडयावर पडलेला होता.

(2) उन्हक नावाच्या राजाने तो खोदविला आहे.

(3) तेथे उष्णोदकाचे झरे आहेत.

(4) शिलालेखाच्या बाजूला उन्हकदेवाचे मंदिर आहे.

**13.** शिलालेख व त्यांचा काळ यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| I. | कुडल शिलालेख | A. | शके 1066 |
| II. | अक्षीचा शिलालेख | B. | शके 1002 |
| III. | चनई शिलालेख | C. | शके 940 |
| IV. | आंबे शिलालेख | D. | शके 912 |
| | | E. | शके 934 |

| | I | II | III | IV |
|---|---|---|---|---|
| (1) | A | D | C | B |
| (2) | C | E | B | A |
| (3) | B | A | E | D |
| (4) | D | E | B | A |

**14.** हाल राजाने 'गाथासप्तशती' हा महाराष्ट्री-प्राकृत भाषेतील ग्रंथ कोणत्या ठिकाणी रचला ?

(1) पैठण (2) नेवासे

(3) देवगिरी (4) त्र्यंबकेश्वर

**15.** 'ज्योतिषरत्नमाला' हा आद्य मराठी ग्रंथ नाही हे सप्रमाण सिद्ध करणारे संशोधक कोण ?

(1) शं.दा. पेंडसे (2) रा.चिं. ढेरे

(3) वि.भि. कोलते (4) श्री.रं. कुलकर्णी

**16.** पुढील नाटके कालानुक्रमे लावा.

(1) प्रेमशोधन, मतिविकार, मूकनायक, वीरतनय

(2) मतिविकार, वीरतनय, प्रेमशोधन, मूकनायक

(3) मूकनायक, वीरतनय, प्रेमशोधन, मतिविकार

(4) वीरतनय, मूकनायक, मतिविकार, प्रेमशोधन

**17.** विष्णूदास भावे हिंदी भाषेत प्रयोग करीत ते 'गोपीचंद' नाटक कोणी लिहिले ?

(1) वा.वि. बापट (2) नारायण दिनकर गोडबोले

(3) अनंत दीक्षित-जोशी (4) वा.वि. देशपांडे

**18.** 'तोकोनामा' हे प्रवासवर्ण कोणाचे आहे ?

(1) पु.ल. देशपांडे (2) मृणालिनी देसाई

(3) प्रभाकर पाध्ये (4) कमल फडके

**19.** 'कॅक्टस् फ्लावर' हा कवितासंग्रह कोणाचा आहे ?

(1) संजीवनी मराठे (2) अनुराधा पोतदार

(3) अश्विनी धोंगडे (4) रजनी परूळेकर

**20.** 'ईश्वर मृतात्मायास शांती देवो' हा कथासंग्रह कोणाचा आहे ?

(1) अनिल डांगे (2) श्याम मनोहर

(3) भारत सासणे (4) रंगनाथ पठारे

**21.** जॉर्जं ऑर्वेलच्या 'ॲनिमल फार्म' चा मराठीत अनुवाद कोणी केला ?

(1) श्रीकांत लागू (2) वि.रा. करंदीकर

(3) विद्याधर पुंडलिक (4) सुभाष भेंडे

**22.** मनुभाई पंचोली (दर्शक) यांच्या ‘सॉक्रेटीस’ आणि ‘दीपनिर्वाण’ या गुजराती कादंबऱ्यांचे मराठी अनुवाद कोणी केले ?

(1) उषा पुरोहित (2) मृणालिनी देसाई

(3) लीला बावडेकर (4) स्मिता भागवत

**23.** ‘आगीचा दर्या’ या नावाने श्रीपाद जोशी यांनी अनुवादित केलेल्या मूळ उर्दू कादंबरीचे लेखन कोणाचे ?

(1) इस्मत चुगताई (2) सरदार जाफरी

(3) खाजा अहमद अब्बास (4) कुर्रतुलऐन हैदर

**24.** मॉलिनॉस्की यांच्या ‘सेक्स अँड रिप्रेशन इन सॅव्हेज सोसायटी’ या ग्रंथाचा ‘असंस्कृत समाजातील लैंगिकता’ या नावाने अनुवाद कोणी केला ?

(1) धोंडो केशव कर्वे (2) रघुनाथ धों. कर्वे

(3) दिनकर धों. कर्वे (4) इरावती कर्वे

**25.** पूर्वसूरींच्या प्रतिभा, अभ्यास आणि परिश्रम या तीन काव्यकारणांच्यां जोडीला स्वास्थ्य, भक्ती आणि अनिर्वेद यांचा समावेश कोणी केला ?

(1) कुंतक (2) भोज

(3) मम्मट (4) राजशेखर

**26.** ‘सर्वभावानाम् भाव: स्थायी महान् इह’ ।

असे स्थायिभावाचे महत्त्व कोणी सांगितले ?

(1) हेमचंद्र (2) भरत

(3) वामन (4) अभिनवगुप्त

**27.** रससंख्येमध्ये वत्सल रसाची भर कोणी धातली ?

(1) रूद्रट (2) भोज

(3) विश्वनाथ (4) मधुसूदन सरस्वती

**28.** नाटक आणि प्रकरण हे भरताने वर्णन केलेले पूर्ण स्वरूपाचे रूपकप्रकार असून नाटकाचा नायक प्रख्यात राजा असावा आणि प्रकरणाचा नायक अमात्य, वणिक किंवा विप्र असावा असे म्हटले आहे.

(1) संपूर्ण विधान चूक
(2) संपूर्ण विधान बरोबर
(3) पूर्वार्ध चूक उत्तरार्ध बरोबर
(4) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

**29.** गद्यात रचना करणे कठिण आहे म्हणून गद्य हाच कवीचा निकष आहे – "गद्यं कवीनां निकषं वदन्ति" – हे मत कोणाचे ?

(1) कुंतक
(2) दण्डी
(3) भामह
(4) वामन

**30.** पुढीलपैकी कोणता ग्रंथ अप्पय्यदीक्षिताचा नाही ?

(1) कुवलयानंद
(2) चित्रमीमांसा
(3) अलंकारसर्वस्व
(4) वृत्तिविवेक

**31.** ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| I. | काव्यादर्श | A. | आनंदवर्धन |
| II. | ध्वन्यालोक | B. | मम्मट |
| III. | काव्यमीमांसा | C. | दण्डी |
| IV. | काव्यप्रकाश | D. | रूय्यक |
| | | E. | राजशेखर |

| | I | II | III | IV |
|---|---|---|---|---|
| (1) | B | E | A | C |
| (2) | D | B | C | A |
| (3) | A | C | D | E |
| (4) | C | A | E | B |

**32.** आनंदवर्धना ने 'लक्षणा' या अर्थी कोणता शब्द वापरला आहे ?

(1) गुणवृत्ति (2) सारोपा

(3) साध्यवसाना (4) गौणी

**33.** "विशिष्ट भौतिक परिस्थितीत विशिष्ट प्रकारच्याच विचारसरणी व कलाकृती निर्माण होत असतात व प्रत्येक फरकाला अनुकूल असेच कलेचे स्वरूप व तंत्र बनत असते ....... समाजाच्या विचारसरणीचे प्रतिबिंब तत्कालीन साहित्यात पडत असते म्हणून साहित्य हे सामाजिक जीवनाच्या प्रतिबिंबासारखे असते." हा अभिप्राय कोणी व्यक्त केला आहे ?

(1) दि.के. बेडेकर (2) लालजी पेंडसे

(3) शरच्चंद्र मुक्तिबोध (4) कुसुमावती देशपांडे

**34.** सौंदर्यशास्त्रविषयक पुढील ग्रंथ प्रकाशनाच्या कालक्रमानुसार लिहा.

(1) सौंदर्यशोध आणि आनंदबोध, सौंदर्यानुभव, सौंदर्य आणि ललितकला, सौंदर्याचे व्याकरण

(2) सौंदर्याचे व्याकरण, सौंदर्यशोध आणि आनंदबोध, सौंदर्य आणि ललितकला, सौंदर्यानुभव

(3) सौंदर्य आणि ललितकला, सौंदर्यशोध आणि आनंदबोध, सौंदर्याचे व्याकरण, सौंदर्यानुभव

(4) सौंदर्य आणि ललितकला, सौंदर्याचे व्याकरण, सौंदर्यशोध आणि आनंदबोध, सौंदर्यानुभव

**35.** मूळ ग्रंथाचे ज्ञान, सत्यप्रीती, शांत स्वभाव आणि सहृदयता हे चार गुण टीकाकारास आवश्यक आहेत, असे सांगणारा 'ग्रंथांवर टीका' हा निबंध कोणी लिहिला ?

(1) बा.अ. भिडे (2) ह.ना. आपटे

(3) श्री.कृ. कोल्हटकर (4) वि.कृ. चिपळूणकर

**36.** 'मराठी वाङ्मय इतर देशीय वाङ्मयापेक्षा हिणकस आहे' या टीकेची खिल्ली उडवणारा 'मुशियन वाङ्मयाचा परिचय' हा लेख कोणी लिहिला ?

(1) चिं.वि. जोशी (2) पु.ल. देशपांडे

(3) गंगाधर गाडगीळ (4) भालचंद्र नेमाडे

**37.** साहित्याच्या मूल्यमापनात ‘मौलिकता’ आणि ‘नवीनता’ हे दोन मूल्यनिकष महत्त्वाचे मानले जातात असे कोणी म्हटले आहे ?

(1) झाक देरिदा
(2) रोलाँ बार्थ
(3) स्टीफन मोरोव्हॅस्की
(4) जोनाथन कलर

**38.** सिद्धांत आणि विचारवंत यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| I. | ऐतिहासिक भौतिकवाद | A. | गॉर्की |
| II. | विरोधविकासवाद | B. | एंगल्स |
| III. | अतिरिक्त श्रमसिद्धांत | C. | हेगल |
| IV. | समाजवादी वास्तवतावाद | D. | मार्क्स |
| | | E. | आल्थुसे |

| | I | II | III | IV |
|---|---|---|---|---|
| (1) | D | A | B | E |
| (2) | C | D | A | B |
| (3) | A | C | B | D |
| (4) | B | C | D | A |

**39.** उत्तरसंरचनावादी सिद्धांताचा मुख्य शिल्पकार कोण ?

(1) फ्रीड्रिख नीत्शे
(2) मिचेल फुको
(3) लेवी-स्ट्रॉउस
(4) जे.एल. ऑस्टिन

**40.** मानववंशविज्ञान हे शास्त्र मानवी व्यवहाराच्या अर्थरूपाचा वेध घेऊ शकत नाही; त्यासाठी भाषाविज्ञानावर व चिन्हमीमांसेवर आधारून संरचनावादी सांस्कृतिक चिकित्सा करायला हवी अशी धारणा कोणाची होती ?

(1) सस्यूर
(2) लेवी-स्ट्राउस
(3) रोलाँ बार्थ
(4) झाक लाकां

**41.** पुढील शब्दांच्या जातींतील क्रियाविशेषण कोणते ?

(1) दैववशात (2) खालावणे

(3) उठाठेव (4) पिवळे

**42.** मराठीने आख्यातविभक्तीचे बरेच प्रकार महाराष्ट्री भाषेतून स्वीकारले आहेत, असे म्हणता येते, कारण 'हतीस > हत्तीस्स,' 'आगीस > अग्गिस,' 'करीन > करिस्सामो', 'करिशील > करिस्सासि' ही रूपे महाराष्ट्री होत.

(1) संपूर्ण विधान चूक (2) संपूर्ण विधान बरोबर

(3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर (4) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**43.** क्रियापदाच्या कर्ता व कर्म हया दोन कारकांच्या लिंग-वचन-पुरुषावर आकाराला येणारे रूप म्हणजे प्रयोग, असे मानले तरी ते कधी कर्त्याला तर कधी कर्माला तसेच कधी स्वत:लाही अनुसरते.

(1) संपूर्ण विधान चूक (2) संपूर्ण विधान बरोबर

(3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर (4) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**44.** 'उपजला भावो । तुझे कृपें सिद्धी जावो' – हया चरणामधील 'कृपें' ह्या शब्दातील विभक्ती ओळखा

(1) तृतीया (2) चतुर्थी

(3) षष्ठी (4) सप्तमी

**45.** रामा, गोविंदा आणि विष्णू काल गेले. – ह्या वाक्याचा प्रकार कोणता ?

(1) संयुक्त वाक्य (2) केवल वाक्य

(3) मिश्र वाक्य (4) विध्यर्थक वाक्य

**46.** शेषशायी, कुंभकार, द्विज व ग्रंथकार ह्या समासांचा प्रकार कोणता ?

(1) षष्ठी तत्पुरुष समास (2) उपपद तत्पुरुष समास

(3) अलुक् समास (4) कर्मधारय समास

**47.** दूरचित्रवाणीवर बातम्या सादर करताना कोणत्या गोष्टीची सर्वाधिक काळजी घेणे महत्त्वाचे आहे ?

(1) प्रक्षोभक भाषेचा वापर टाळून सुयोग्य भाषेचा अवलंब करणे.

(2) घटनेचा आशय यथार्थपणे निरूपित करणे.

(3) सुसंगत दृश्यांचे प्रक्षेपण करणे.

(4) सुरावटीसह अनुवाचन करणे.

**48.** श्राव्य माध्यमातील जाहिरातीतील प्रमुख घटक कोणता ?

(1) निवेदकाच्या आवाजातील माधुर्य व आवाहकता

(2) पार्श्वसंगीताचा वापर

(3) निवेदकाचे आकर्षक व्यक्तिमत्त्व

(4) विक्रीच्या वस्तूची उपयुक्तता सांगणारी प्रभावी भाषा

**49.** वृत्तपत्रामध्ये वृत्तलेखन करताना कोणती बाब सर्वात जास्त महत्त्वाची असते ?

(1) संबंधित घटनेचे वस्तुनिष्ठ व अचूक लेखन

(2) स्वमतप्रतिपादन

(3) उपस्थित असणाऱ्यांच्या प्रतिक्रिये चे वर्णन

(4) भाषेचा भावपूर्ण वापर

**50.** शिक्षणमंत्र्यांना देण्यात येणाऱ्या निवेदनासाठी योग्य मायना कोणता ?

(1) माननीय शिक्षणमंत्री<br>महाराष्ट्र राज्य,<br>मंत्रालय,<br>मुंबई

(2) राजमान्य राजश्री शिक्षणमंत्री<br>महाराष्ट्र राज्य,<br>मंत्रालय, मुंबई<br>यांस.,<br>सप्रेम नमस्कार

(3) आदरणीय शिक्षणमंत्री साहेब,<br>महाराष्ट्र राज्य,<br>मंत्रालय, मुंबई<br>यांना<br>सादर प्रणाम

(4) मेहेरबान शिक्षणमंत्री साहेब<br>महाराष्ट्र राज्य,<br>मंत्रालय, मुंबई,<br>हुजूरचरणी दंडवत

**Space For Rough Work**